# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. सर्वसाधारण सभा दिनांक 18/09/2019

## सभा सुचना क्रं. 7 दु.4.30 वा.

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | **प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.111 मध्ये लॉरेन्स परेरा ते साफल्य बंगल्यापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे व मुळगाव चर्च ते वेलंकनी भुजींग सेंटर पर्यंत अस्तित्वातील गटारावर स्लॅब टाकणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत** | **ठराव** :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रु. 98,08,544/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस मा.आयुक्त हयांनी मा.स्थायी समितीपुढे शिफारस केली आहे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (ज्योती धोंडेकर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | **आदिवासी एकता परिषद यांनी आदीवासी समाजाच्या विविध मागण्याबाबत दिलेले निवेदन.** | प्रस्तावाचा निर्णय - सदर प्रस्तावाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली. प्रस्तावात नमुद केलेनुसार उपलब्ध पाडयांची नोंद व सिमांकन गाव नकाशावर करणेबाबत महसुल व भूमी अभिलेख विभागास कळविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>सभागृहात चर्चेच्या अनुषंगाने सन्मा. सदस्यांनी सूचित केलेली पाडयांची नावे प्रभाग क्र.89 मधील कामणगांव परिसरातील बेळकडी छोटी, बेलकडी मोठी, टेपाचा पाडा, तांबळमाळ, सावंत पाडा, खिंडीपाडा, पाचवीपाडा, देवदळ, सागपाडा, ठाकरेपाडा, चिंचोटी संपूर्ण गांव व पाडे, कोल्ही पूर्ण गांव व पाडे, बापाडे, ससुनवघर, सातीवली तसेच वॉर्ड क्रमांक 107 मधील चोबारे खारपाडा, वाडवली खारपाडा, घाटाळनगर उमेळा, लोहियानगर, उमेळा फाटा इत्यादी ठिकाणच्या आदिवासी पाडयांची नोंद घेऊन त्याप्रमाणे सदर पाडयांची नोंद व सिमांकन गाव नकाशावर करणेबाबत महसूल व भूमी अभिलेख विभागास कळविण्यास हि सभा मंजूरी देत आहे.<br>तसेच ज्या ज्या सदस्यांनी आदिवासी पाडयांची नांवे दिली नाहीत त्या त्या सदस्यांनी आदिवासी पाडयांची नांवे संकलित करुन प्रभाग समितीच्या सभापती महोदयांना दयावीत. त्यानंतर सभापती महोदयांनी त्यांचेकडे प्राप्त होणा-या आदिवासी पाडयांची नांवे सन्मा. महापौर महोदय यांना देणेत यावीत. |

| | | |
|---|---|---|
| | | सभापती महोदयांकडून उपलब्ध होणारी नांवे स्विकारण्याचे अधिकार हे सन्मा. महापौर महोदय यांना देणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>वरील प्रकरणी सन्मा. महापौर महोदय यांनी अंतिम केलेल्या आदिवासी पाडयांची यादी प्रभाग समिती यांचे सहा.आयुक्त यांना उपलब्ध करुन दिलेनंतर सहा.आयुक्त यांनी महसुल व भूमी अभिलेख विभागास सदर पाडयांची नोंद व सिमांकन गाव नकाशावर करणेबाबतची कार्यवाही करणेबाबत कळवावे.<br>वरील सर्व बाबीस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (रुपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

**नगरसचिव**
**वसई विरारशहर महानगरपालिका**